वर्धा,दि 21 – माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणा-या जय महाराष्ट्र या लोकप्रिय कार्यक्रमामध्ये महात्मा गांधी हिंदी विश्वविद्यापिठाचे जनसंपर्क अधिकारी बी.एस.मिरगे विद्यापिठाच्या अभ्यासक्रमाविषयी माहिती देणार आहे. हा कार्यक्रम 22 जुलै रोजी सायंकाळी 7.25 वाजता सह्याद्री वाहिनीवरुन प्रसारित होईल.




हिंदी विद्यापिठातील अभ्यासक्रमविविषयी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना माहिती व्हावी आणि येथे उपलब्ध असलेल्या गुणवत्तापुर्ण शिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक मोहन राठोड यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला. नुतकेच या कार्यक्रमाचे रेकार्डिंग मुंबई येथे झाले असून सुप्रसिध्द निवेदक



प्रदिप भिडे यांनी श्री मिरगे यांची मुलाखत घेतली आहे. यावेळी माहिती विभागाचे वरिष्ठ सहायक संचालक मिनल

जोगळेकर, अर्चना शंभरकर, संध्या गरवारे ,सुनंदा भोर हिंदी विद्यापिठाचे  प्रा.राजेश लेहकपुरे, अतुल पांडे उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून हिंदी विद्यापिठाच्या अभ्यासक्रमाविषयी माहिती करुन घेण्याचे आवाहन माहिती संचालक मोहन राठोड यांनी केले.